**तक्रार युएलपी क्र. ०९/२०१७**
**निशाणी क्रं. यु—१८**

**<u>वि.प.तर्फे ॲड. श्री. व्ही.एस.चव्हाण यांचेकडून साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, खातेनिहाय चौकशी झाली त्यावेळी मी रंकाळा स्टॅड येथे कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, वाहतुक नियंत्रक हे पद डीपीओ यांच्या नियंत्रणाखाली येते. हे म्हणणे खरे आहे की, रंकाळा येथे वाहतुक नियंत्रक हे एकच पद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दैनंदिन कामकाजाचे स्वरुप लेखापढी करणे हे आहे. तसेच बसेसवर नियंत्रण करणे हे माझ्या कामाचे स्वरुप आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या कामाचे रिपोर्टीग नियंत्रक प्रमुख यांना करते. हे म्हणणे खरे आहे की, वाहतुक नियंत्रक पद हे बस आल्या—गेल्याचे, त्यांचे नियोजन करणे अशा स्वरुपाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कागदपत्रे तपासुन विद्यार्थ्यांना व नागरिकांना पास दयायचे की नाही हे मी ठरवते. हे म्हणणे खरे आहे की, पासची विक्री आणि वितरण झाल्याचे महिन्याचे स्टेटमेंट मी माझ्या वरिष्ठांना देते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील कलम ४ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कामाचे स्वरुप पर्यवेक्षकीय व व्यवस्थापकीय स्वरुपाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जे काम करते ते दुसरे कर्मचारी करत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वाहतुक नियंत्रणाचे काम दुसरे कोणीही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाहतुक नियंत्रणाचे काम वाहतुक नियंत्रक या पदाची व्यक्तीच करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी कर्मचारी म्हणून केलेली तक्रार खोटी व चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी तक्रार चालण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रात नमुद केलेला सर्व मजकूर खोटा व चुकीचा असून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

कोल्हापूर.
दिनांकः—३०/०४/२०२५

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.